मागणी क्र.झेडजी-०३, प्रधानशीर्ष २२२५ अंतर्गत "इमाव प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी दिवंगत वसंतराव नाईक गुणवत्ता बक्षिस योजनेस" नवीन लेखाशीर्ष उघडण्यास मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग,
शासन निर्णय क्रमांक: पुरस्कार-२०१८/प्र.क्र.१७९/शिक्षण
मादाम कामा रोड,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : १६ मे,२०१९

प्रस्तावना :-

"राज्यातून व विभागातून माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेत सर्वप्रथम येणाऱ्या इतर मागास प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थी व विद्यार्थीनींना स्व. वसंतराव नाईक गुणवत्ता पुरस्कार प्रदान योजना" राज्यात लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यास अनुसरुन नवीन लेखाशिर्ष उघडण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

मागणी क्र.झेडजी-३, प्रधानशीर्ष २२२५ अंतर्गत "इमाव प्रवार्गतील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी दिवंगत वसंतराव नाईक गुणवत्ता बक्षिस योजना" या योजनेकरिता नवीन उपशीर्ष उघडण्यास मान्यता देण्यात येत आहे. नवीन लेखाशीर्षाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

"मागणी क्र.झेडजी-०३, प्रधानशीर्ष २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक यांचे कल्याण, ०३-मागासवर्गीयांचे कल्याण २७७- शिक्षण ०४- बक्षिसे आणि पुरस्कार (०४)(०२) "इमाव प्रवार्गतील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी दिवंगत वसंतराव नाईक गुणवत्ता बक्षिस योजना (२२२५ एफ २३६) (कार्यक्रम)	Demand No.ZG-03. 2225, WELFARE OF SCHEDULED CASTES, SCHEDULED TRIBES, OTHER BACKWARD CLASSES AND MINORITIES (03) WELFARE OF BACKWARD CLASSES 277- Education 04- Rewards and Awards (04)(02) Late Vasantrao Naik Merit Reward Scheme for Other Backward Classes Students (2225 F 236) (Scheme)

२. हे आदेश महालेखापाल कार्यालय (लेखा व हकदारी) १, मुंबई, महाराष्ट्र, यांच्याशी विचारविनिमय करुन त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. सं.ख.वि/चा-१/विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग/ युओआर-२१२/२०१८-१९/०७, दि.०२.०४.२०१९ तसेच, वित्त विभागाच्या अनौ.सं.क्र ३७३/ व्यय-१४, दि. ०४/०३/२०१९ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३.   सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५१७११२७१८१५२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAVINDRA VASANTRAO GURAV

Digitally signed by RAVINDRA VASANTRAO GURAV
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=0030b22364370f4d96ab251b7263219586c0069b661c3f9cd6fd67e55000ce92, postalCode=400032,
street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=9dfb7aefbd9e82b129c324d567b46e1d853d93c38d6e222c868eac72ecd12784, ou=VJNT OBC AND SBC DEPT,
o=GOVERNEMENT OF MAHARASHTRA, cn=RAVINDRA VASANTRAO GURAV
Date: 2019.05.29 15:05:56 +05'30'

(रविंद्र गुरव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत, माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित:-

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) एक/दोन, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (TM Section) महाराष्ट्र, मुंबई
३) कार्यासन व्यय-१४ / अर्थसंकल्प-५, वित्त विभाग मंत्रालय, मुंबई
४) कार्यासन-१४१३, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
४) संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे
५) निवड नस्ती.